Vol-13 Special Issue- 1.4 ISSN- 2349-7076

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter)
Patron: Prof. R. G. Kothari
Chief Editor: Prof. Jignesh B. Patel
Email:- Mo. 9429429550 ctefeduinspire@gmail.com

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या समग्र साहित्यातील मानवता, शांती, विकास व उन्नती या विचारांचे 'वसुधैव कुटुंबकम' भावनेच्या विकासातील योगदान : एक अभ्यास

**डॉ. शेखराम येळेकर**
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे बॅरि. एस. के. वानखेडे शिक्षण महाविद्यालय नागपूर
**श्री. विवेक माया मनोहर जिचकार**
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे बॅरि. एस. के. वानखेडे शिक्षण महाविद्यालय नागपूर

**सारांश**

भारतीय संत परंपरेत अनेक संत होऊन गेले. त्यांनी त्यांच्या काळातील सदोष रूढी, प्रथा व परंपरा यावर हल्ला करून तत्कालीन समाजातील दोष दूर करून समकालीन समाजाचे कल्याण करण्याचा प्रयत्न केला. समाजाला मानवता व शांतीच्या मार्गाने विकास व उन्नतीकडे नेण्याचे कार्य त्यांनी केले. महाराष्ट्र ही तर संतांची भूमी म्हणूनच ओळखली जाते. १३ व्या शतकातील संत नामदेव महाराज ते अगदी अलीकडे २० व्या शतकातील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज अशी खूप मोठी संत परंपरा आपल्याला लाभलेली आहे. भारतीय संतपरंपरा ही केवळ अध्यात्मापुरती मर्यादित न राहता सामाजिक, सांस्कृतिक व राष्ट्रीय जीवनाला दिशा देणारी परंपरा राहिली आहे. या संत परंपरेत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज (१९०९ – १९६८) यांचे स्थान अत्यंत महत्वाचे आहे. त्यांनी आपल्या समग्र साहित्यातून मानवता, शांती, विकास व उन्नती या मुल्यांचा पुरस्कार केला. त्यांचे विचार व्यक्तिगत मोक्षापुरते मर्यादित न राहता समाज, राष्ट्र आणि अखिल मानवजातीच्या कल्याणाशी निगडीत आहेत. वसुधैव कुटुंबकम ही भारतीय संकल्पना तुकडोजी महाराजांच्या विचारातून व्यवहारात उतरलेली दिसते.

**शब्दावली :** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, समग्र साहित्य, मानवता, शांती, विकास, उन्नती, वसुधैव कुटुंबकम

**प्रस्तावना :**

वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचा जन्म महाराष्ट्रातील अमरावती जिल्ह्यातील यावली या गावी ३० एप्रिल १९०९ रोजी झाला. त्यांनी त्याच्या हयातीत देश-विदेशात भ्रमण करून अनेक ठिकाणांना भेटी दिल्या. त्यातून त्यांची वैश्विक दृष्टी विकसित झाली. त्यांनी त्यांच्या साहित्यातून, भाषण, प्रवचन यातून राष्ट्रीय एकात्मता, मानवता, शांती याचीच शिकवण दिली. त्यांनी मराठी व हिंदी भाषेत केलेल्या लिखाणात त्याच्या व्यक्तिमत्वातील वसुधैव कुटुंबकम या संकल्पनेचे प्रतिबिंब पडलेले आढळून येते.वसुधैव कुटुंबकम म्हणजे संपूर्ण विश्व एक कुटुंब आहे ही भावना. ही उपनिषदांची खूप मोठी शिकवण भारतीय संस्कृतीने जगाला दिलेली आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी जीवनभर हीच शिकवण आपल्या भजनातून व लेखनातून समाजाला दिली. त्यांनी लिहिलेली ग्रामगीता जरी ग्रामास केंद्रबिंदू मानून लिहिली असली तरी तिचा मूळ उद्देश विश्वकल्याण हाच आहे.

गाव करावे सर्वांगपूर्ण | आदर्श चित्र विश्वाचे ||४८||
गाव हा विश्वाचा नकाशा | गावावरून देशाची परीक्षा |
गावचि भंगता अवदशा | येईल देशा ||४९||

EduInspire- E-Journal -ISSN- 2349-7076

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

यावरून आपल्याला लक्षात येईल की, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी गावाला विश्वाचा नकाशा संबोधले आहे. त्यांच्या मते गाव जर भंगले तर देशाला अवदशा येईल. त्यामुळे विश्वाचे आदर्श चित्र तयार करण्यासाठी गाव सर्वप्रथम स्वयंपूर्ण करावे लागतील असे मत त्यांनी मांडले. यासाठी त्यांनी आपल्या साहित्यातून मानवता, शांती, विकास व उन्नतीचे विचार मांडले.

## संशोधनाची गरज व महत्व :

आधुनिक काळात विश्वस्तरावर वाढती हिंसा, जात-धर्मीय संघर्ष, भौतीकतावाद आणि नैतिक मुल्यांचा ऱ्हास यामुळे मानवतेसमोरील आव्हाने तीव्र झाली आहेत. आज देशाच्या सिमा पुसट होत आहे. आज मनुष्य कधी नव्हे इतका एकमेकाशी विविध माध्यमातून जोडल्या गेला आहे. आज विश्वबंधुत्वाची भावना सर्व मनुष्यमात्रात वृद्धींगत होणे ही काळाची गरज आहे. अशा परिस्थितीत राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे विचार मार्गदर्शक ठरू शकतात. त्यांच्या समग्र साहित्यातील मानवता, शांती, विकास व उन्नती या संकल्पनांचा वसुधैव कुटुंबकम भावनेशी असलेला संबंध अभ्यासाने आजच्या जागतिक समाजासाठी उपयुक्त आहे.

## संशोधनाची उद्दिष्ट्ये :

वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या समग्र साहित्यातील मानवतावादी विचाराचा अभ्यास करणे.
शांती, विकास व उन्नती याबाबत राष्ट्रसंतांच्या दृष्टिकोनाचे विश्लेषण करणे.
वसुधैव कुटुंबकम या संकल्पनेच्या विकासात त्यांच्या विचारांचे योगदान स्पष्ट करणे.
समकालीन समाजासाठी त्यांच्या विचारांची उपयुक्तता अधोरेखित करणे.

## संशोधन पद्धती :

सदर संशोधनासाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे ग्रंथ, अभंग, प्रवचने तसेच त्यांच्या विचारांवर आधारित द्वितीयक संदर्भग्रंथांचा उपयोग करण्यात आला आहे.

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे विचारविश्व :

राष्ट्रसंत तुडकोजी महाराज हे फक्त अध्यात्मिक संत नव्हते तर ते व्यवहारवादी व वास्तववादी संत होते. त्यांनी त्यांच्या हयातीत त्यांच्या लेखन व कार्यातून संपूर्ण मानवजातीच्या कल्याणाचीच भूमिका घेतली. त्यांनी गाव-देश-विश्व याविषयी जे चिंतन केले त्यातून एक बाब प्रकर्षाने अधोरेखित होते ती ही की, गाव हाच विश्वाचा केंद्रबिंदू आहे. जर विश्वाचे कल्याण करावयाचे असेल तर त्यासाठी गावाच्या विकासापासून सुरुवात करावी लागेल. गावातील शेतकरी, शेतमजूर, भूमिहीन या सर्व घटकांचा विकास करावा लागेल. पण दुर्दैवाने या बाबत शासन उदासीन असल्याचेच आढळून येते.

## मानवता, शांती, विकास व उन्नतीचे तात्विक विश्लेषण :

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे समग्र साहित्य अभ्यासल्यास असे आढळून येते कि त्यांनी त्यांच्या संपूर्ण लिखाणात मानवता, शांती, विकास व उन्नती या शास्वत मुल्यांच्याच आधारावर राष्ट्र उभारणी व विश्व कल्याण यांची सांगड घातली आहे. हे चारही घटक एकमेकांना पूरक आहे. यातच स्वातंत्र्य, समता व बंधुता या भारतीय संविधानिक मूल्यांचे प्रतिबिंब पडल्याचेही दिसून येते.

## वसुधैव कुटुंबकम भावनेच्या विकासातील योगदानाचा अभ्यास :

अयं निज: परो वेति गणना लघुचेतसाम |
उदारचरिताना तु वसुधैव कुटुंबकम ||

हा मूळ श्लोक महाउपनिषदाच्या अध्याय क्रमांक सहा मध्ये आढळून येतो. 'वसुधैव कुटुंबकम' हा भारतीय समाजातील सर्वात मोठा भाव आहे. प्रत्येक भारतीयाचा तो स्थायी स्वभाव आहे. भारतीय संस्कृतीचा तो मूळ गाभा आहे. 'वसुधैव कुटुंबकम' च्या

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

पायावरच भारतीय समाज व्यवस्थेचा विकास होत गेला. या देशातील सर्व संतानी त्यांच्या जीवनकाळात या संकल्पनेनुसारच लेखन व कार्य केले. सर्वांनी जाती, धर्म, भाषा, पंथ, लिंग, वर्ण यांना छेद देत मानवतेची मुल्याचा स्वीकार करून त्याच्या प्रचार व प्रसारात मोलाचे योगदान दिले.

## मानवता हाच खरा धर्म :

मानवता म्हणजे माणूस म्हणून माणसाशी वागण्याची भावना होय. करुणा, सहवेदना, समता, बंधुता, परस्पर आदर म्हणजेच मानवता होय. महाराजांनी जाती-पाती, वर्ण आणि अंधश्रद्धा दूर करून माणसाने माणसाशी माणसासारखे वागावे, हा विचार मांडला. त्यांच्या मते 'मानवताही धर्म मेरा, इंसानियतही पक्ष मेरा' हेच साऱ्या जगाचे ब्रीदवाक्य असावे.

मानवता हेचि आपुले नाम | मग स्वधर्म म्हणजे मानव धर्म ||
ते तरी ध्यानी घ्या सत्य वर्म | साध्या बोली ||

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज म्हणतात, मानवता हेच आपले नाव म्हणजे ओळख असावी. मानवता हाच आपला स्वधर्म म्हणजेच मानव धर्म असावा.

मग घ्या कोणत्याही धर्माचे वचन | परि वर्म याहुनि नाही भिन्न |
मानवता हीच आहे खुण | सर्वधर्म समन्वयाची ||

राष्ट्रसंतांच्या मते, जगाच्या पाठीवर जितकेही धर्म असतील, त्या सर्व धर्माची एकच शिकवण आहे, सर्वधर्मीय एकत्र येण्यासाठी मानवता हीच महत्वाची खुण आहे.

मानवतेची जागवाया शिकवण | गावी असावे कला, कीर्तन |
पोथी पुराणाचे वाचन | हेचि शिकवाया गावासि ||

जर सर्वांमध्ये मानवतेची शिकवण वृद्धींगत करावयाची असेल तर गावाने एकत्र येणे गरजेचे आहे. त्यासाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज ग्रामीण भागातील लोकांमध्ये लोकप्रिय असणाऱ्या कला, कीर्तन, पोथी पुराणाचे वाचन यासारख्या माध्यमांचा उपयोग करायला सांगतात.

### शांती आणि विश्वबंधुत्व :

शांती म्हणजे केवळ युद्धाचा अभाव नव्हे तर मनाची, समाजाची व व्यवस्थेची समतोल अवस्था होय. एवढेच नव्हे तर १९५५ साली जपानमधील विश्वशांती परिषदेत त्यांनी सर्वांना विश्वबंधुत्वाचा संदेश दिला. ज्याद्वारे त्यांनी जागतिक शांततेचे महत्व अधोरेखित केले.

समानतेची समाजरचना | शांती देईल जीवजना |
प्रगतीची नवनवी प्रेरणा | करील भुवना उन्नत |
शोषण अथवा शासन | यांचे गळोनि पडेल बंधन |
नाही शत्रूंचे आक्रमण | स्वयंपूर्ण गाव होता |
दास होतील विविध ताप | जुरेल वैताग, वैर, पाप |
गाव झालीया स्वर्गरूप | शांती लाभेल विश्वासी |

राष्ट्रसंत म्हणतात,

हो मित्रप्रेमी, ग्रामप्रेमी, राष्ट्रप्रेमी हो अम्ही |
प्रदेश-प्रेमी 'धर्मरत', धर्मादिप्रेमी हो अम्ही ||
हे विरू दे 'आम्ही तुम्ही', दे विश्वबंधू-भावना |
जगदीश्वरा | या भारती, ही सामुदायिक प्रार्थना ||

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

हे जगदीश्वरा ! मी मित्रप्रेमी, ग्रामप्रेमी, राष्ट्रप्रेमी, प्रदेशप्रेमी, धर्मप्रेमी कुणीही असू दे परंतु तू माझ्यातील तुझे-माझे ही भावना नष्ट करून विश्व बंधुत्वाची भावना दे.

विश्व स्नेह का ध्यान धरे, सबका सब सन्मान करे |

लहर की बरखा मध्ये राष्ट्रसंत म्हणतात –

शांतीसरिखा तप नही, संतोषसम नहि सुख कही |

## ग्रामविकास आणि उन्नती :

उन्नती म्हणजे आंतरिक, नैतिक, बौद्धिक, सामाजिक किंवा अध्यात्मिक प्रगती होय. विचारांची परिपक्वता, मुल्यांची वृद्धी, नैतिकता, संवेदनशीलता, मानवता वाढणे, व्यक्ती व समाजाची चेतनात्मक प्रगती म्हणजे उन्नती होय. ग्रामगीतेद्वारे त्यांनी गावे स्वावलंबी, स्वच्छ आणि सुसंकृत बनविण्याचा संदेश दिला. गावाचा विकास हाच राष्ट्राचा विकास आणि त्याद्वारे विश्वाचा विकास ही संकल्पना त्यांनी मांडली.

ईश्वर निर्मिले हे विश्व, म्हणुनी जगची आम्हा देव |
विश्वाचा मूळ घटक गाव, ग्रामगीता त्याच साठी ||

- ग्रामगीता

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज म्हणतात, ईश्वराने हे विश्व निर्माण केले असल्याने हे विश्वच आमच्यासाठी देव आहे. गाव हे विश्वाचा एक अंश आहे. त्याचा विकास होण्यासाठीच ग्रामगीतेची निर्मिती झाली आहे.

विश्व ओळखावे आपणापासून | आपणची विश्वघटक जाण |
व्यक्तीपासुनि कुटुंब निर्माण | कुटुंबापुढे समाज आपुला ||४५||
समाजापुढे ग्राम आहे | ग्रामापुढे देश राहे |
देश मिळोनी ब्रम्हांड होय | गतीगतीने जवळ ते ||४६||
मानव मात्राचे प्रथम माहेर | आपले गाव त्यातील घर |
यातुनि प्रगति करीत सुंदर | पुढे जावे विश्वाच्या ||४७||
प्रथम पाया मानव वर्तन | यास करावे उत्तम जतन |
गाव करावे सर्वांगपूर्ण | आदर्श चित्र विश्वाचे ||४८||
गाव हा विश्वाचा नकाशा | गावावरून देशाची परीक्षा |
गावचि भंगता अवदशा | येईल देशा ||४९||

## सामाजिक एकता व समता :

समग्र साहित्यातून त्यांनी सामाजिक एकात्मतेचा पुरस्कार केला. सर्वांना समान हक्क व प्रेम देण्यावर भर दिला. जे जागतिक बंधुत्वासाठी आवश्यक आहे.

हर देश मे तू, हर भेष मे तू, तेरे नाम अनेक, तू एकही है |
तेरी रंगभूमि यह विश्वभरा, सब खेलमे, मेलमे तु ही तो है ||

सारी मानवजात एक व्हावी आणि सामाजिक समता प्रस्थापित करून एक नवीन भारत निर्माण व्हावा अशी राष्ट्रसंतांची मनीषा होती. ते लिहितात-

जागो बालको | युवक – युवतियो | बुलंद करो आवाज |
पिछडो को लो साथ | अनपढ को दो हाथ |
करो मानव एक जात | समता की हो बात |

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

## शिक्षण आणि लोकजागृती :

त्यांनी निरक्षरता दूर करून लोकांमध्ये जागरुकता निर्माण केली जे मानवी उन्नतीसाठी महत्वाचे आहे.

## समकालीन समाजासाठी उपयुक्तता

आज जग जरी झपाट्याने एकत्र येऊन एक छोटे खेडे झाले असले तरी ते आज मनुष्यासाठी सुरक्षित राहिले नाही. कुटुंबसंस्था झपाट्याने ऱ्हास पावत आहे. लोकांचा नैतिक मुल्यांवरचा विश्वास नष्ट होत आहे. वर्ण, जात, धर्म, भाषा, प्रांत, रंग, लिंग अशा विविध गटात मनुष्य विभागल्या जात आहे. भ्रष्टाचार शिष्टाचार म्हणून समजल्या जात आहे. मनुष्य एकमेकांची फसवणूक करून स्वतः समृध्द होऊ इच्छित आहे. नातेसंबंधातील जिव्हाळा व आपुलकी नष्ट होत आहे. मनुष्य कोणत्या विचारावर आचरण करावे या संभ्रमावस्थेत आहे. व्यसनाधीनता, भोगवृत्ती वाढलेली आहे. देशाची संपत्ती असणारी आजची बालके भावनिक व शारीरिक दृष्ट्या कमकुवत झाली आहे. शिक्षण हे रोजगाराचे साधन झाले आहे. कुटुंब, शाळा/महाविद्यालय व समाज ही संस्कार केंद्रे संस्कार करण्यास असमर्थ ठरत आहे. दुर्दैवाने या सर्व अधोगतीवर अजूनही शासन व प्रशासन योग्य उपाययोजना करू शकलेले नाही. अशा या काळात अखिल भारतीय श्रीगुरुदेव सेवा मंडळ हे वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे विचार व कार्यपद्धतीनुसार संस्कार व सेवा या माध्यमातून विश्वकल्याणाचे कार्य करीत आहे. त्याचा सकारात्मक परिणाम ग्रामीण व शहरी भागात होत असल्याचे प्रस्तुत सशोधना दरम्यान आढळून आला.

## निष्कर्ष :

आजच्या काळात विश्वाच्या कल्याणासाठी प्रत्येक व्यक्तीत विशेषतः विद्यार्थ्यामध्ये मानवता, शांती, विकास व उन्नती या मुल्यांची रुजवणूक करणे ही काळाची गरज आहे. त्यासाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे समग्र साहित्याचा अभ्यास शाळा, महाविद्यालय स्तरावर होणे आवश्यक आहे. ग्रामगीतेचा प्रचार व प्रसार घरोघरी होणे अत्यावश्यक आहे. त्यासाठी ग्रामगीता जीवन विकास परीक्षा शासनाने प्रत्येक विद्यार्थ्यास व शाळेस बंधनकारक करावी.सामुदायिक ध्यान व प्रार्थना मंदिर गावोगावी उभारण्यात यावे. अखिल भारतीय श्रीगुरुदेव सेवा मंडळाच्या तत्वप्रणालीनुसार बाल संस्कार शिबीर गावोगावी आयोजित करण्यात यावी. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे जीवन व साहित्यावर आधारित प्रबोधन व प्रवचनाचे कार्यक्रम सर्वत्र आयोजित करण्यात यावी.

## संदर्भ

मोडक, रं. सं. (२०२४). राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आणि आदिवासी समाज. बहुजन साहित्य प्रसार केंद्र, नागपूर

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे सामाजिक योगदान, डॉ. देवयानी व्ही. चव्हाण, असोसिएट प्रोफेसर, जी. एस. कॉलेज ऑफ कॉमर्स अंड इकॉनॉमिक्स, नागपूर (महाराष्ट्र), भारत

सहस्त्रबुद्धे, प्र. ग. (२०१७). जीवनमूल्ये भाग ३. श्रीभारती प्रकाशन, नागपूर.

सुबोधदादा.(२०२४).ग्रामगीता सार. एस प्रकाशन, नागपूर.

सावरकर सुदाम (२०१९). जीवनयोगी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज (चरित्र : खंड ४) अर्थात संयोजन पर्व, मराठी जनसाहित्य परिषद, अमरावती.

Meshram R. P. (2020). Value Education. Kulasachiva Kavikulguru Kalidas Sanskrit Univversity, Ramtek.

कडवे रघुनाथ. (२०१९). मानवतेचे महापुजारी राष्ट्रसंत तुकडोजी. संस्कार प्रकाशन, नागपूर

मोहोड बाबा.(२०१८). राष्ट्रसंतांची प्रवचने. श्रीगुरुदेव प्रकाशन. गुरुकुंज आश्रम

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

घोडे राम. २००५. समाज संजीवन ग्रामगीता, नागपूर. चैतन्य साहित्य

नागतोडे किरण. २०२५. विश्वविक्रम प्रणेता वं. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज गौरवान्वित महाग्रंथ, वर्धा, सुधीर प्रकाशन

नारखेडे लक्ष्मण भाऊ, सक्रीय पाठ, अड्याळ टेकडी, ब्रम्हपुरी, श्री गुरुदेव आत्मानुसंधान प्रकाश मंडळ

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज. २०१७. ग्रामगीता, गुरुकुंज आश्रम, गुरुदेव प्रकाशन

सोलापुरे राजशेखर. २०२५. ग्रामोद्धाराचे प्रणेते राष्ट्रसंत तुकडोजी, लातूर, विद्याभारती प्रकाशन